Rotary
Club of Latur Mid-town

UNITE FOR GOOD

साप्ताहिक

# रोटरी दिशा

## ROTARY CLUB OF LATUR MID-TOWN

ROTARY INTERNATIONAL DISTRICT 3132 | Club No.: 22604

डिसेंबर - २०२५ | सतरावा अंक

## ऑल द बेस्ट विशेषांक



Rtn.Francesco Arezzo
RI President 2025-26



Rtn.Sudhir Lature
Dist.Governor 2025-26



Rtn.Amol Dadge
President



Rtn.Pawan Malpani
Secretary



## Guest Editor Rtn.Jagdish Kulkarni



प्रिय रोटेरियन बांधवांनो,

सेवा आणि संस्कृती जेव्हा एकत्र येतात, तेव्हा समाजात केवळ मदत नाही तर सकारात्मक परिवर्तन घडते. रोटरी अन्नपूर्णा या सेवाभावी प्रकल्पाच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेला ''ऑल द बेस्ट'' या नाटकाचा प्रयोग याचेच जिवंत उदाहरण ठरला.हा नाट्यप्रयोग केवळ मनोरंजनाचा कार्यक्रम नव्हता;तो गरजू ज्येष्ठ नागरिकांच्या अन्नसेवेसाठी उभा राहिलेला संवेदनशील उपक्रम होता.आणि म्हणूनच, प्रेक्षकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद, हाऊसफुल प्रयोग आणि सर्व स्तरांतून मिळालेली प्रशंसा हे या कार्यक्रमाच्या प्रचंड यशाचे द्योतक ठरले.रोटरी अन्नपूर्णा हा उपक्रम सहा वर्षांपासून अखंडपणे चालू आहे.या प्रकल्पामागे असलेली माणुसकी, सातत्य आणि समर्पणयाच भावनेने हा नाट्यप्रयोगही साकार झाला.नाटकाच्या माध्यमातून सेवा प्रकल्पासाठी निधी उभारणी करणे, हा एक अभिनव आणि प्रेरणादायी प्रयत्न ठरला आहे.या यशस्वी कार्यक्रमासाठी नाटकातील सर्व कलाकार, दिग्दर्शक, तांत्रिक टीम, संयोजक, स्वयंसेवक,आणि उपस्थित सर्व प्रेक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार.या कार्यक्रमातून उभारलेला प्रत्येक रुपया हा ज्येष्ठ नागरिकांच्या अन्नथाळीतला आधार ठरणार आहेआणि हेच या उपक्रमाचे खरे यश आहे.हा विशेषांक पूर्णतः या नाट्यप्रयोगास समर्पित करताना मला अतिथी संपादक म्हणून अपार आनंद आणि अभिमान वाटतो.हा अंक केवळ आठवणींचा संग्रह नसून,तो सेवा, कला आणि समाजभान यांचा सुंदर संगम आहे.चला, या यशातून प्रेरणा घेत अन्नपूर्णा प्रकल्प अधिक मजबूत करूया,आणि रोटरीच्या "Service of Self" या तत्त्वाला नव्या उंचीवर घेऊन जाऊया.

रो.जगदीश कुलकर्णी
अतिथी संपादक, रोटरी दिशा

## Sattelite Club Meeting Photos






Rotary Club of Latur Midtown यांच्या वतीने २५ गतिमान महिलांचा नवीन सॅटेलाइट क्लब आपल्या रोटरी परिवारात लवकरच सहभागी होत आहे, त्या सर्वांचे हार्दिक स्वागत करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. आपला उत्साह, नेतृत्वगुण आणि समाजसेवेप्रती असलेली बांधिलकी रोटरीच्या ''Service Above Self - स्वतःपेक्षा सेवा श्रेष्ठ'' या मूल्यांना अधिक बळकट करतो. महिला सदस्यत्व महिला सशक्तीकरण महिला रोटरीमध्ये दूरदृष्टी संवेदनशीलता आणि परिवर्तन घडविणारी ऊर्जा घेऊन येतात. जेव्हा महिला नेतृत्व करतात, तेव्हा समाज प्रगती करतो आणि रोटरी अधिक सक्षम व प्रभावी बनते. आपला सहभाग समाजात सकारात्मक बदल घडवेल आणि पुढील पिढ्यांना प्रेरणा देऊन सशक्त भविष्य घडवेल, याची आम्हाला खात्री आहे. आपल्या सक्रिय सहभागाची व प्रभावी योगदानाची आम्ही आतुरतेने वाट पाहत आहोत. रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाउन अध्यक्ष, सचिव, क्लब मेंबरशिप डायरेक्टर, असिस्टंट गव्हर्नर, डिस्ट्रिक्ट वूमन मेंबरशिप डायरेक्टर, डिस्ट्रिक्ट चेअर - न्यू सॅटेलाईट क्लब आणि टीम लातूर मिडटाउन सह ज्यांनी ज्यांनी ह्या क्लब स्थापनेसाठी प्रयत्न केले त्या सर्वांना धन्यवाद व अनेक शुभेच्छा!!

# ऑल द बेस्ट क्षणचित्रे...




















# Rotary Mid Town this Week  Photo Gallery





## रोटरी क्लबच्या वतीने ऑल दे बेस्ट नाटकाचा प्रयोग, रसिकांचा प्रतिसाद

लातूर । मराठी रंगभूमीवर ९० च्या दशकातील गाजलेल्या नाटकापैकी एक असलेल्या देवेंद्र पेम लिखित-दिग्दर्शित 'ऑल द बेस्ट'या नाटकाचा प्रयोग लातूर शहरात झाला. रोटरी क्लब आयोजित अन्नपूर्णा योजनेच्या सहकार्यासाठी शहरातील दयानंद सभागृहात हे नाटक संपन्न झाले. या नाटकातील प्रमुख कलाकार मयुरेश पेम, मनमित पेम, निखिल चव्हाण, अवंतिका कवठेकर यांनी महत्वाची बजावली. नाट्य व्यवस्थापक नीलेश सराफ यांनी या नाट्य प्रयोगाच्या संपूर्ण नियोजनाची जबाबदारी निभावली. यावेळी लातूर शहरातील १००० नाट्यरसिकांनी या नाटकाचा मनमुराद आनंद लुटला.







**Congratulations President, Secretary,TRF Director**



**Team Rotary Mid Town in Kindle TRF Seminar Ahilyanagar**